म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय बालसाहित्य
दा. क्र. ३२५५

# बाळ पंचतंत्र ६



BVBK-0403277
BVBK-0403277

म. ग्रं. सं. ठाणे,
ग्र. क्र. [redacted]


# बाल पंचतंत्र

## भाग पाचवा

लेखक
त्र्यंबक पुरुषोत्तम थोरात

BVBK-0403277

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

किंमत ३ रुपये

बाल

पंचतंत्र

# निवेदन

ज्ञानदान करण्याचे वाङ्मयाचे जे अनेक प्रकार आहेत त्यांत 'कथा किंवा गोष्ट' ह्या प्रकाराला फार वरचे स्थान दिले जाते. हा प्रकार प्राचीन काळापासून आपल्या देशात रूढ आहे. उपनिषदांसारख्या वेदान्दपर ग्रंथांतील गहन तत्त्वे सुलभ रीतीने समजावून देण्यास प्राचीन ऋषींनी गोष्टींचाच आश्रय केलेला आढळतो. महाभारतकारांनीसुद्धा दृष्टान्तांकरता अनेक सुंदर कथा सांगितलेल्या आहेत. बुद्ध, महावीर, ख्रिस्त, महंमद ह्यांसारख्या महान धर्मप्रवर्तकांनी गोष्टींच्याच साह्याने आपला उपदेश लोकांच्या मनात ठसविला ह्याची साक्ष त्यांचे ग्रंथच देतात.

बालवाङ्मयात तर गोष्टीला अग्रस्थानच देण्यात आले आहे. कल्पित कथांची मुलांना अत्यंत आवड असते. ह्यामुळे त्यांच्या साह्याने एखादा उपदेश किंवा नीतितत्त्व बालमनावर मनोरंजक रीतीने सहज बिंबविता येते.

संस्कृत वाङ्मयात हितोपदेश व पंचतंत्र हे दोन कथाग्रंथ अत्यंत लोकप्रिय झालेले आहेत. दोन्ही ग्रंथांची रचना एकाच पद्धतीची आहे. एक मोठी कथा घेऊन तींत अनुषंगाने अनेक उपकथा सांगून मूळ तत्त्वाचे स्पष्टीकरण करावयाचे, ही ती पद्धती होय. स्पष्टीकरण करताना ग्रंथकर्त्यांनी अनेक सुभाषिते व व्यवहारांतील नीतितत्त्वे ह्यांचा संग्रह केला. त्यामुळे सदर ग्रंथ अबालवृद्धांस व्यवहारज्ञान शिकविण्यास समर्थ झाले आहेत.

तथापि लहान मुलांच्या मनोधर्माचा विचार केल्यास, त्यांना अवांतर उपदेशापेक्षा सरळ लिहिलेली मूळ कथाच जास्त आकर्षक वाटते. ही मनोवृत्ती लक्षात घेऊन मी पंचतंत्रातील अन्यत्र प्रसिद्ध न झालेल्या अशा काही सुंदर गोष्टी निवडून त्या पाच भागांत लिहिल्या आहेत. त्यांची भाषा शक्य तितकी सुबोध ठेवली असून प्रसंगानुरूप चित्रेही दिली आहेत.

त्र्यं. पु. थोरात

© केशव भिकाजी ढवळे

पुनर्मुद्रण · एप्रिल १९९५

लेझर टाइपसेटिंग : दि विझिविग, श्रीसमर्थ सदन, गिरगाव, मुंबई ४

मुद्रक
स. ग. परुळकर
जस्मिन आर्ट
वडाळा उद्योग भवन
वडाळा, मुंबई ३१

प्रकाशक
ज्योती धनंजय ढवळे
केशव भिकाजी ढवळे
पहिली भटवाडी
गिरगाव, मुंबई ४

बाल पंचतंत्र : ५

# मूर्ख विद्वान्

गोष्ट पहिली

विद्या नसली तरी एक वेळ चालेल पण मनुष्याला तारतम्य बुद्धी पाहिजे. ती नसेल तर कसा नाश होतो पाहा.

चौघे ब्राह्मण एकमेकांचे जिवलग मित्र होते. त्यांपैकी तिघे चांगले विद्वान् होते, पण त्यांस तारतम्य बुद्धी नव्हती. चौथा विद्वान् नव्हता पण त्याची बुद्धी मोठी तरतरीत होती.

एके दिवशी सहज गोष्टी बोलत बसले असताना त्यांच्या मनात विचार आला की, आपण विद्या शिकलो पण कोठे तरी राजदरबारी जाऊन मानमान्यता मिळविल्याशिवाय तिचा उपयोग काय? तेव्हा आपण कोठेतरी देशांतरास जावे.

असा विचार करून एके दिवशी ते चौघेही निघाले. वाटेत एकजण म्हणाला, 'आपण तिघे आपल्या विद्येच्या जोरावर जो पैसा मिळवू त्यातला ह्या सुबुद्धीला काही देणार नाही; कारण तो मुळीच विद्या शिकला नाही.' दुसऱ्यानेही त्याच्या म्हणण्याला दुजोरा दिला आणि सुबुद्धीला घरी परत जाण्यास सांगितले; पण तिसऱ्याला त्या दोघांचे म्हणणे आवडले नाही. तो

म्हणाला, ‘आपण चौघेही बालमित्र. आजपर्यंत आपण एके ठिकाणी वाढलो, खेळलो सावरलो. तेव्हा आताच याला वगळणे योग्य नाही. आपल्याला जे काही मिळेल त्यातलाच थोडासा वाटा आपण ह्याला देऊ.’

शेवटी ह्या गोष्टीस ते दोघे कबूल झाले व चौघेजण पुढे निघाले. जाता जाता त्यांना अरण्य लागले. तेथे एका जागी मेलेल्या सिंहाची हाडे पडलेली होती. ती पाहून एक जण म्हणाला, ‘आपल्या विद्येची कसोटी पाहाण्यास ही संधी बरी आली आहे. ह्या मेलेल्या प्राण्याला आपण जिवंत करू.’ असे म्हणून त्याने ती सर्व हाडे जमविली व ती जागच्या जागी बसवून सिंहाचा सांगाडा तयार केला. लगेच दुसऱ्याने त्यात मांस व रक्त घालून तो कातड्याने मढविला. तिसरा आता त्याला जिवंत करणार इतक्यात् सुबुद्धी म्हणाला, ‘महामूर्खांनो, हा कोणता प्राणी झाला पाहिलेत का? हा सिंह झाला. याला जर तुम्ही जिवंत केलेत तर तो आम्हा सर्वांनाच खाऊन नाही का टाकणार?’

त्या बरोबर तो जीव घालण्यास तयार झालेला महापंडित म्हणाला, ‘तू स्वत: महाशंख आणि आम्हाला मूर्ख म्हणतोस? आम्ही आपल्या विद्येची परीक्षा घेणार!’

सुबुद्धी म्हणाला, ‘चुकलो, आपण फार फार शहाणे आहात! आपण खुशाल विद्येची परीक्षा पाहा; पण

मी ह्या झाडावर चढेपर्यंत थांबा.' असे म्हणून झटकन् तो शेजारच्या झाडावर चढून बसला.



इकडे त्या पंडिताने त्या सिंहाच्या सांगाड्यात जीव घातला. त्याबरोबर सिंह जिवंत होऊन त्याने त्या तिघाही मूर्ख पंडितांना खाऊन टाकले आणि तो निघून गेला.

सिंह निघून गेल्यावर सुबुद्धी झाडावरून खाली उतरला व घरी परत गेला.

❁ ❁ ❁

# कोष्ट्याचा मूर्खपणा

ज्याला स्वतःला अक्कल नाही व जो मित्रांचा योग्य सल्ला न ऐकता केवळ बायकोच्याच विचाराने चालतो त्याचा कधी कधी कसा नाश होतो ते पाहा!

एका गावी मंथरक नावाचा एक कोष्टी राहात होता. तो मागावर कापड विणीत असे. एकदा त्याचा माग मोडल्यामुळे नवीन माग बनविण्यासाठी लाकडे आणण्याकरता तो रानात गेला. तेथे एक भला मोठा वृक्ष पसंत करून तो तोडण्याकरता त्यावर त्याने कुऱ्हाड मारली.

इतक्यात् त्या झाडावरील समंध त्याला म्हणाला, 'बाबा रे, मी आज कित्येक वर्षे ह्या झाडावर सुखाने राहात आहे. म्हणून तू हा वृक्ष तोडू नको.'

कोष्टी म्हणाला, 'मी तरी काय करू? मला नवीन माग बनविण्याकरता लाकडे मिळाली नाहीत तर माझ्या कुटुंबाचे पोषण कसे होईल? तेव्हा तू दुसऱ्या झाडावर जा. मला हे झाड तोडलेच पाहिजे.'

समंध म्हणाला, 'असे जर आहे तर मी तुला तू मागशील तो वर देतो; पण हे झाड तू दुखवू

नकोस.' ते ऐकून कोष्टी म्हणाला, 'बरे आहे. मी घरी जाऊन माझ्या मित्राला व बायकोला कोणता वर मागावा हे विचारून येतो.'

समंधाने ते कबूल केले व कोष्टी परत घरी येण्यास निघाला. तो गावाच्या वेशीपाशी येतो तो त्याला त्याचा मित्र भेटला. त्याला समंधाची हकीगत सांगून कोष्ट्याने विचारले, 'मित्रा, त्याच्याजवळ कोणता वर मागू?'

मित्र म्हणाला, 'समंध देतोच आहे तर तू राज्य माग. म्हणजे तू राजा होशील व मी तुझा प्रधान होईन; मग आपण सुखाने राहू.'

कोष्ट्याने ते ऐकून घेतले व तो म्हणाला, 'तू चांगले सांगितलेस. आता घरी जाऊन मी बायकोचा विचार घेतो. ती काय म्हणते ते पाहू.'

मित्राने त्याला ह्या कामी बायकोचा विचार न घेण्याबद्दल पुष्कळ सांगितले; परंतु कोष्ट्याला ते रुचले नाही व तो घरी गेला.

नंतर त्याने बायकोला समंधाची हकीगत व मित्राने सांगितलेला विचार, सर्व सांगून तिचे मत विचारले.

तेव्हा बायको म्हणाली, 'राज्य मागणे सोपे आहे पण चालविणे महाकठीण आहे. राजाला स्वस्थपणाने झोपसुद्धा घेता येत नाही. राज्यामुळेच राम व पांडवांना

वनवास घडला. नळराजा देशोधडीस लागला आणि रावणांसारख्यांचा नाश झाला. तेव्हा राज्याचा वर काही मागू नका.'

कोष्ट्याला बायकोच्या शहाणपणाचे कौतुक वाटले व तो म्हणाला, 'तू सांगशील तसा वर मागतो.'

बायको म्हणाली, 'तुम्हाला एका वेळेस एकच वस्त्र विणता येते. त्यामुळे आपल्या कुटुंबाचे कसेबसे पोषण होते. तुम्ही समंधाजवळ दोन डोकी व चार हात मागा; म्हणजे तुम्हाला एकाच वेळी दोन वस्त्रे विणता येतील. त्यापैकी एकाच्या पैशांवर आपला कुटुंबखर्च भागेल व दुसऱ्याचे पैसे इतर खर्चाकरता राहून आपल्याला थाटामाटाने राहाता येईल. त्यामुळे आपल्याला जातीतसुद्धा मान्यता मिळेल; तसेच वेळप्रसंगी आपणास परोपकारही करता येईल.'

बायकोचे विचार ऐकून कोष्ट्याला आनंद झाला व तो तसाच वर मागण्याचा निश्चय करून समंधाकडे गेला. तो समंधास म्हणाला, 'तू जर मला इच्छित वर देणार असशील तर मला आणखी एक डोके व दोन हात दे.'

समंधाने 'बरे आहे' म्हटले. त्याबरोबर कोष्ट्याला आणखी एक डोके व दोन हात फुटले व तो विचित्र प्राणी दिसू लागला.



आपल्या मनासारखे झालेले पाहून मोठ्या आनंदाने कोष्टी घरी परत येऊ लागला; परंतु गावाजवळ येताच त्याचे ते विचित्र रूप पाहून 'हा राक्षसच आहे' असे लोकांना वाटले आणि त्यांनी काठ्यांनी व दगडांनी मारून त्याला घरी पोचण्यापूर्वीच ठार केले.

❁ ❁ ❁

शाखा.
3200 20/3/90
विषय

गोष्ट तिसरी

# खेकड्याने वाचविले

सोबती असल्याशिवाय प्रवासाला जाऊ नये असे शहाणे म्हणतात. त्याप्रमाणे वागल्यास कसा लाभ होतो पाहा.

एका गावात ब्रह्मदत्त नावाचा एक ब्राह्मण राहात होता. त्याला कामानिमित्त प्रवासाला जाण्याचा प्रसंग आला. तेव्हा त्याची आई म्हणाली, 'बाबारे! कोणी तरी सोबतीला घेतल्याशिवाय एकटाच जाऊ नको.'

ब्रह्मदत्त म्हणाला, 'आई, एकटे जाण्यात भीती कसली आहे? रस्ता अगदी रहदारीचा आहे. बरे, काम जरूरीचे असल्यामुळे मला गेलेच पाहिजे. आता मला कोण सोबतीला मिळणार?'

त्याचा निश्चय पाहून आईने शेजारच्या विहिरीतून एक खेकडा आणला व मुलास म्हटले, 'दुसरा कोणी मिळत नाही तर हा खेकडाच बरोबर घेऊन जा.'

आईच्या आग्रहास्तव ब्रह्मदत्तने तो खेकडा कापराच्या एका द्रोणात ठेवला व तो द्रोण एका वाटीत घेऊन तो निघाला. जाताना त्याला दुपार झाली. तेव्हा ऊन टळेपर्यंत तो एका झाडाखाली विश्रांतीसाठी थांबला. तेथे तो थोडा आडवा झाला तोच त्याला



झोप लागली. तेवढ्या अवधीत शेजारच्या झाडाच्या ढोलीतून एक साप बाहेर पडला. कापराच्या वासावर तो ब्रह्मदत्तजवळ आला व त्याने त्याच्या जवळच्या वाटीतील कापूर ताबडतोब खाऊन टाकला; परंतु कापराच्या द्रोणात असलेल्या खेकड्याने त्याला टोचून टोचून इतके घायाळ केले की, साप तेथल्या तेथेच मरण पावला.

ब्रह्मदत्त जागा होऊन उठतो तो जवळच एक मेलेला साप त्याच्या दृष्टीस पडला. तो खेकड्यानेच मारला असला पाहिजे अशी त्याची खात्री झाली व आपला जीव वाचवल्याबद्दल त्याला फार आनंद झाला. आईच्या सांगण्यावर विश्वास ठेवून वागलो याचे हे फळ, असा विचार मनात येताच त्याची आईवरील भक्ती अधिकच वाढली !

❁ ❁ ❁

बाल पंचतंत्र : ५

गोष्ट चौथी

# अती लोभाचे फळ

परिणाम काय होईल ह्याचा विचार न करता जो अतिलोभाने एखादे कृत्य करतो त्याची कशी विटंबना होते पाहा.

एका नगरात चंद्र नावाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या मुलांना वानरांचा अतिशय नाद लागला. वानरांच्या कळपांना खायला प्यायला घालून धष्टपुष्ट करावे व त्यांच्या क्रीडा कौतुकाने पाहाव्यात यातच त्यांचा सर्व वेळ जाई.

राजवाड्यात लहान राजकुमारांना बसण्याकरता काही बोकड पाळले होते. त्यातला एक बोकड़ अतिशय खादाड होता. तो बेधडक स्वयंपाकघरात शिरून जी वस्तू दिसेल ती खाऊन टाकी. यामुळे आचारी लोक अगदी संतापून जात व त्याला हाकून लावण्यासाठी भांडे, लाकूड इत्यादि जे काही हातात येईल ते त्याच्यावर फेकून मारीत.

हा प्रकार वानरांच्या कळपाच्या मुख्य वानराने पाहिला, तेव्हा त्याला वाटले की, ही गोष्ट एखादे वेळी आपल्या नाशास कारण होईल; त्यापूर्वीच आपण सावध होऊन येथून निघून जावे हे बरे.

हा आपला विचार त्याने आपल्या अनुयायांना सांगितला; परंतु आयते यथेच्छ खायला प्यायला मिळत असल्यामुळे गर्वाने चढून गेलेल्या त्या इतर वानरांनी त्याची थट्टा केली व ते उलट त्यालाच दोष देऊ लागले. त्याने अनेक प्रकारांनी त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला; पण ते काही ऐकेनात. तेव्हा निरुपायास्तव तो एकटाच रानात निघून गेला.

काही दिवस लोटल्यावर एके दिवशी नेहमीप्रमाणे तो बोकड स्वयंपाकघरात शिरला असता एका आचाऱ्याने एक जळते लाकूड त्याच्या अंगावर फेकले. त्यामुळे त्याच्या अंगावरील लोकर पेटली व तो ओरडत ओरडत घोड्यांच्या पागेकडे धावत जाऊन आग विझावी म्हणून तेथील गवतात लोळू लागला. त्याबरोबर जिकडे तिकडे आगीचा डोंब पसरला. पागेतील कित्येक घोडे भाजून मेले, तर कित्येक होरपळून दावी तोडून पळाले.

ह्या गोंधळाचे वर्तमान राजाच्या कानी गेले. तेव्हा घोड्यांच्या जखमांवर उपाय करण्याकरता राजवैद्य बोलावण्यात आले. त्यांनी या जखमांवर वानरांची चरबी लावावी म्हणून सांगितले. तेव्हा राजाने तावडतोब सर्व वानर मारून त्यांची चरबी काढण्याचा हुकूम केला. मग काय विचारता? हा हा म्हणता सर्व वानरांची कत्तल करण्यात आली व त्यांच्या चरबीने

घोड्यांचे जीव वाचवण्यात आले. आपल्या कळपातील सर्व वानर ठार मारल्याची बातमी त्या मुख्य वानराला समजली, तेव्हा त्याला अत्यंत दुःख झाले आणि त्याने त्या राजाचा नाश करण्याचा निश्चय केला.

एके दिवशी तो एका सरोवराच्या काठी आला. तेथे त्याला त्या तळ्याकडे गेलेल्या माणसांची पावले तेवढी उमटलेली दिसली; पण परत आलेल्यांची पावले काही दिसली नाहीत. ह्यावरून सरोवरातील सुसरीबिसरीने त्यांना खाऊन टाकले असावे अशी शंका येऊन तो काठावरच बसला व कमळाचे देठ पाण्यात बुडवून त्याने पाणी पिऊ लागला.

इतक्यात् सरोवरातून एक राक्षस बाहेर आला. त्याच्या गळ्यात एक रत्नांचा हार होता. तो वानराला म्हणाला, 'तुझा धूर्तपणा पाहून मी संतुष्ट झालो आहे. तुला पाहिजे तो वर माग. मी देतो.'

वानराने विचारले, 'एका सपाट्यात तू किती माणसे खाऊन टाकशील!'

राक्षस म्हणाला, 'ह्या सरोवराच्या पाण्यात जितकी माणसे शिरतील तितकी सर्व खाऊन टाकीन.

वानर म्हणाला, 'मला एका राजाचा सूड घ्यावयाचा आहे. तेव्हा तू हा रत्नहार जर मला देशील तर त्याच्या मोहाने मी त्या राजाला त्याच्या परिवारासह

येथे घेऊन येईन. राक्षसाने ते कबूल करून तो हार वानरास दिला.

तो हार गळ्यात घालून वानर चंद्रराजाच्या नगरात गेला. त्याच्या गळ्यातील तो देदिप्यमान हार पाहून लोकांना कौतुक वाटले व 'हा कोठून आणलास?' असे त्यांनी त्याला विचारले.

वानर म्हणाला, 'एका अरण्यात कुबेराचे एक गुप्त सरोवर आहे. त्यात रविवारी सकाळी जो स्नान करतो त्याला असा हार प्राप्त होतो.'

थोड्याच वेळात ही गोष्ट राजाला समजली. त्याने वानराला बोलावून खरी हकीगत विचारली. तेव्हा तो म्हणाला, 'महाराज, याला साक्ष हा माझा हार आहेच; तथापि आपली खात्री करून घ्यायची असेल तर माझ्याबरोबर कोणी मनुष्य पाठवा.'

ते ऐकून राजाच्या मनाला मोह पडला. तो म्हणाला, 'तर मग आम्ही आपल्या सर्वच परिवारासहच तेथे येतो. म्हणजे आम्हाला रगड हार मिळतील.'

याप्रमाणे ठरले व राजा आपल्या परिवारासह निघाला. वानर राजाच्या रथात बसला होता.

थोड्याच वेळात ते सरोवरापाशी पोचले; तेव्हा वानर म्हणाला, 'महाराज आता सर्व मंडळींना सरोवरात एकदम प्रवेश करण्यास सांगा. आपण दोघे मागून



जाऊ. तेथे गेल्यावर मी तुम्हाला त्या रत्नहारांची खाणच दाखवीन.'

त्याच्या सांगण्याप्रमाणे राजाने आज्ञा केली, तेव्हा राण्या, राजपुत्र, चाकर, नोकर वगैरे सर्व मंडळी सरोवरात शिरली. राक्षसाने त्यांना खाऊन टाकले.

बराच वेळ वाट पाहिल्यावर कोणी बाहेर येत नाही असे पाहून राजाने विचारले, 'काय रे, अजून कसा कोणी बाहेर येत नाही?'

हे ऐकताच वानर शेजारच्या झाडावर चढला व म्हणाला, 'हे दुष्ट राजा, त्या सरोवरातील राक्षसाने सर्वांना खाऊन टाकल्यामुळे आता कोणीही बाहेर येणार नाही. तू माझ्या कुळाचा नाश केलास तो आठवतो का? त्याचा हा मी सूड घेतला बरे! आता एकटाच परत राजधानीस जा'.

❋ ❋ ❋ समाप्त.



BVBK-0403277
32567 2013/11